आतील पानात

- विश्वरचियेता - प्रभू विश्वकर्मा...
- साप्ताहिक राशिफल ९ ते १५ फेब्रुवारी २०२५
- रत्नागिरी जिल्ह्यात लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांची पडताळणी सुरु....

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १७९
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, रविवार, दि.०९ फेब्रुवारी २०२५


## थोडक्यात

### बोर्ड परीक्षेसाठी विंचूर केंद्राची आसनव्यवस्था जाहीर

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.८, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे एचएससी बोर्डाची (केंद्र क्रमांक ०२७१) ११ फेब्रुवारी ते १८ मार्च २०२५ या कालावधीत परीक्षा आयोजित केली आहे. तरी सदर परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची आसनव्यवस्था जाहीर केली आहे. विंचूर केंद्रावर कला शाखेच्या बैठक क्र. ड१०७६६२ ते ड१०७८४१ असे एकूण १८० विद्यार्थी व विज्ञान शाखेच्या बैठक क्र. ड०३२८०३ ते ड ०३३०२८असे एकूण २२६ विद्यार्थी परीक्षेला बसलेले आहेत. कला आणि विज्ञान मिळून एकूण ४०६ नियमित व पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यांची परीक्षा होणार असून त्यांची बैठक व्यवस्था विद्यालयाची मुख्य इमारत, दक्षिण इमारत व नवीन इमारतीत एकूण १६ खोल्यांमध्ये केलेली आहेत. सदर परीक्षेसाठी केंद्र संचालक म्हणून विद्यालयाचे प्राचार्य एन. ई. देवढे, बिल्डिंग कंडक्टर म्हणून प्राध्यापक आर. टी. टिळेकर व पर्यवेक्षक के. जी. जोपळे यांची नियुक्ती केली आहे.

### ई-सिगारेटवर बंदी असूनही खुलेआम वापर



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, अमरावती :** ई-सिगारेटचा वापर, विक्री, आयात-निर्यात आणि उत्पादनावर भारतात बंदी आहे. मात्र, बंदी असतानाही अमरावती शहरातील कॅम्प परिसरातील टेक्सास स्मोकिंग शॉपीत ई-सिगारेटची खुलेआम विक्री आणि वापर केला जात असल्याचा धक्कादायक प्रकार शनिवारी उघडकीस आला. 'क्राइम इंटेलिजन्स युनिट'च्या (सीआययू) पथकाने गाडगेनगर पोलिसांच्या सहाय्याने ही कारवाई केली. यावेळी काही तरुणांना ई-सिगारेटचा वापर करताना ताब्यात घेण्यात आले.

पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या आदेशावरून सीआययू पथक आणि गाडगेनगर पोलिसांनी ही कारवाई पार पडली. शहरात ई-सिगारेटचा वापर आणि विक्री होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. शनिवारी दुपारी पोलिसांच्या पथकाने कॅम्प परिसरातील टेक्सास स्मोकिंग शॉपी या दुकानावर छापा घातला. यावेळी काही तरुण ई-सिगारेट ओढताना दिसून आले. पोलिसांनी या दुकानातून ५५ ई-सिगारेट आणि विशेष सुंगध देणारे घटक जप्त करण्यात आले. या साहित्याची किंमत सुमारे अडीच ते तीन लाख रुपये आहे. सीआययू आणि गाडगेनगर पोलिसांनी ही संयुक्त कारवाई केली असून शाळकरी मुलांना या व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी पोलीस विशेष लक्ष देत आहेत. शहरात ई-सिगारेटची विक्री होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या सिगारेटवर बंदी आहे. तरुणांनी त्यापासून दूर राहिले पाहिजे, असे पोलीस उपायुक्त गणेश शिंदे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

# बुलडाण्यातील केस गळती प्रकरणाला महिना झाला तरी रुग्णसंख्या कमी होईना !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०८, बुलडाणा :** शेगाव तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्याला हादरवणाऱ्या आणि जिल्हा ते राष्ट्रीय पातळीवरील आरोग्य यंत्रणांसमोर आव्हान निर्माण करणाऱ्या आकस्मिक केसगळती आणि टक्कल या गूढ आजाराच्या शेगावातील मुक्कामाला शनिवारी तब्बल एक महिना उलटला! या दीर्घ काळात ना रुग्णसंख्येला 'ब्रेक' लागला, ना अचूक उपचार सापडला, ना अग्रेसर आरोग्य संस्थेचा अहवाल प्राप्त झाला. यामुळे महासत्ता बनण्याची दिवास्वप्ने पाहणाऱ्या देशातील आरोग्य यंत्रणांची मर्यादा अधोरेखित झाली आहे.

देशाचे आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या गृह जिल्ह्यातील ही स्थिती. आजपासून ठीक एक महिन्यांपूर्वी, ८ जानेवारी २०२५ ला शेगाव तालुक्यातील तीन चार गावांत या अनामिक आजाराचे रुग्ण आढळून आले. दुहेरी आकड्यात असलेल्या या टक्कलग्रस्त रुग्णसंख्येने पाहतापाहता शंभरचा आकडा पार केला. गावांची संख्या वाढली, शेगावच्या सीमा ओलांडून नांदुरा तालुक्यातही आजार पसरला. जानेवारीअखेर रुग्णसंख्या २४६ वर गेली. केंद्रीय आरोग्य राज्य मंत्र्यांचा जिल्हा असल्याने भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद (दिल्ली आणि चेन्नई)च्या शास्त्रज्ञाची चमू क्षेत्रीय युनानी, आयुर्वेद, होमियोपॅथी संस्थेचे तज्ज्ञ, राज्याच्या आरोग्य विभागाचे अधिकारी, अकोला शासकीय वैद्यकीय महाविध्यालयाचे तज्ञ असा मोठा फोजफाटा मुक्कामी येऊन गेला. जिल्हा आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी तळ ठोकून राहिले. मात्र तरीही या गूढ आजाराचे नेमके अचूक कारण, निदान आणि रामबाण उपचार देण्यात हे काहीसे कमी पडले. काही रुग्णांचे केस परत आल्याचा दावा करण्यात आला.



**आता १६ गावांत...**

फेब्रुवारीमध्ये रुग्णसंख्या वाढीचा वेग कमी झाला, हाच काय तो दिलासा ठरावा. १ ते ७ फेब्रुवारीदरम्यान आणखी १३ रुग्ण वाढले. यामुळे रुग्णसंख्या २५९ पर्यंत गेली. मात्र, आणखी तीन गावांत टक्कलग्रस्त रुग्ण आढळून आल्याने आरोग्य यंत्रणांना धक्का बसला. शेगाव कालवड, बोंडगाव, कठोरा, भोनगाव, हिंगणा वैजिनाथ, घुई, माटरगाव, पहुजीरा व निंबी तर नांदुरा तालुक्यातील वाडी, अशा १३ गावांमध्ये रुग्ण सापडले होते. आता शेगाव तालुक्यातील कनारखेड गायगाव आणि वरखेड येथेही रुग्ण आढळून आले. परिणामी बाधित गावांची संख्या १६ झाली आहे.

**पद्मश्री डॉ. बावस्कर यांचा निष्कर्ष काय?**

विंचूदंशावरील अचूक उपायामुळे जगात पोहोचलेले पद्मश्री डॉ. हिम्मतराव बावस्कर यांनी काही गावाना भेटी देत रुग्णांशी संवाद साधला. त्यांनी धान्य, पाणी, माती, विटभट्ट्यातील राख, कोळसा याचे नमुने नेले. तपासणीअंती त्यांनी केसगळती 'सेलेनियम'मुळे झाल्याचे सांगितले. रुग्णांच्या शरीरातील सेलेनियमचे प्रमाण सामान्य स्थितीच्या तुलनेत १० पट जास्त असल्याने केसगळती होत असल्याचा त्यांचा नित्कर्ष आहे.

**अहवाल लांबणीवर का?**

हा अनामिक आजार नेमका काय, कशामुळे होतो, निदान काय, उपचार काय? असे अनेक प्रश्न एक महिन्याच्या कालावधीत ऐरणीवर आलेत. आता यावर कळस ठरावा, असा प्रश्न समोर आला आहे. केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री जाधव यांच्या खासगी जनसंपर्क कक्षाने ३ फेब्रुवारीच्या संध्याकाळी मंत्र्यांची दिल्ली येथील महाराष्ट्र सदनात पत्रकार परिषद ठेवली. यात केसगळतीवरील (आयसीएमआरच्या) अधिकृत अहवालाची माहिती देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. मात्र काही वेळातच पत्रपरिषद स्थगित झाल्याचे सांगण्यात आले. याला आता सहावा दिवस उजाडला, तरी मंत्र्यांना हा अहवाल जाहीर करण्यासाठी मुहूर्त मिळाला नाहीये! यामुळे भय इथले संपत नाही, अशी शेगाववासीयांची स्थिती आहे.

# हजारो दिव्यांच्या लखलखाटाने गोदावरी नाथघाट उजळून निघाले गोदावरी !

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, पैठण (छ.संभाजीनगर) :** गोदावरी नदी प्रकटदिनानिमित्त राजमुद्रा प्रतिष्ठानतर्फे नाथ मंदिराच्या मागे नाथघाटावर हजारो दिव्यांची रोषणाई करुन दिपोत्सव साजरा करण्यात आला.



यावेळी मान्यवरांच्या हस्ते गोदावरी नदीला तीनशे पासष्ट मिटर लांबीची साडी अर्पण करण्यात आली. यावेळी पाचोडचे सरपंच शिवराज भुमरे, हभप ज्ञानेश्वर महाराज कोल्हापूरकर, पो.नि. संजय देशमुख, प्रतिष्ठानचे अध्यक्ष तुषार पाटील, जितु भाऊ परदेशी, शालिवाहनचे चेअरमन किशोर चौहाण, शिवनाथ भाग्यवंत, नामदेवराव खराद, बाळासाहेब माने, शहादेव लोहारे किशोर चौधरी, प्रशांत बटवल (येवला), अरुण काळे, रेखाताई कुलकर्णी, ज्योती काकडे, वैशाली परदेशी, विष्णू खंडागळे यांची उपस्थिती होती. यावेळी प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारा गोदावरी पुरस्कार बँकींग क्षेत्रासह सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या शालिवाहन नागरी पतसंस्थेला देण्यात आला.

पतसंस्थेचे चेअरमन किशोर चौहाण यांनी पुरस्कार स्वीकारला.

# चोंभूत परिसरात बिबट्याचा वावर !

## वनविभागाच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष...

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.८, पारनेर (अहिल्यानगर) :** गेल्या काही महिन्यांत बिबट्याच्या वावरामुळे त्रस्त झालेले चोंभूत मधील नागरिक पुन्हा एकदा भयभीत झाले आहेत. चोंभूत परिसरातील ग्रामस्थांना गेल्या आठ दिवसांत अनेक वेळा दिवसा ढवळ्या बिबट्या दिसून आल्यामुळे रहिवाशांमध्ये घबराट पसरली आहे.

वन विभागाकडून ठोस उपाययोजना करून बिबट्यांना बंदिस्त करावे, अन्यथा समता परिषदेचे कार्याध्यक्ष मच्छिंद्र माळी यांच्या नेतृत्वाखाली कोणत्याही स्वरूपाचे तीव्र आंदोलन करण्यात येईल अशा इशारा चोंभूत ग्रामस्थांनी दिला आहे. चोंभूत परिसरात शेतकरी शेतमजूर अनेक ठिकाणी रोजंदारीवर काम करीत असल्यामुळे दुचाकी, तसेच पायवाटेने ये-जा करावे लागत आहे. काही कामगारांना रात्रपाळीवर जावे लागत आहे. दरम्यान, गेल्या आठ दिवसांत चोंभूत ग्रामस्थांना आळकुटी जांबूतकडे जाणारा रस्ता ओलांडताना बिबट्या दिसून आल्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. वन विभागाकडून ठोस उपाययोजना करून बिबट्यांना बंदिस्त करावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

**पिंजऱ्यात अडकलेला बिबट्या पळाला !**

समता परिषदेचे कार्याध्यक्ष मच्छिंद्र माळी यांनी वनविभागाकडे बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावण्याची मागणी केली. त्यानंतर वन अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली मच्छिंद्र माळी यांनी स्वखर्चाने बिबट्याचे वास्तव्य आहे, तेथे पिंजरा लावण्यात आला होता. त्यात पिंजऱ्यात बिबट्या सुद्धा जेरबंद झाला होता. परंतु वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्याच्या आतील खालच्या बाजूच्या फळ्या निकृष्ट दर्जाच्या असल्याने बिबट्याने त्या लाकडी निकृष्ट दर्जाच्या फळ्या चाऊन कुरतडून बिबट्या पळून गेला आहे.

मच्छिंद्र माळी यांनी स्वखर्चाने वनविभागाकडे दुसऱ्या पिंजऱ्याची मागणी केल्यानंतर त्या शेतामध्ये दुसरा चांगला पिंजरा लावण्यात आला आहे. परंतु या पिंजऱ्यात बिबट्या जात नाही. बिबट्या दररोज आमच्या शेतात येत आहे पण बिबट्या पिंजऱ्यात जात नसल्याचे माळी यांनी सांगितले.

# 'कॉपीमुक्त परीक्षा' पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०८, ठाणे :** जिल्ह्यातील सन २०२४- २०२५ या शैक्षणिक वर्षातील इयत्ता दहावी बोर्ड परीक्षा २१ फेब्रुवारी२०२५ व बारावी बोर्ड परीक्षा ११ फेब्रुवारी, २०२५ रोजी सुरू होणार आहे. जिल्हा प्रशासनामार्फत 'कॉपीमुक्त परीक्षा' पार पाडण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. तरी विद्यार्थ्यांनी या परीक्षेस सामोरे जाताना कॉपीमुक्त परीक्षा व भयमुक्त परिक्षेस सामोरे जावे, असे आवाहन राज्याचे मुख्य सचिव तथा पालक सचिव, ठाणे जिल्हा सुजाता सौनिक व दक्षता समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी अशोक शिनगारे व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

जिल्ह्यात दहावी करिता ३३८ परीक्षा केंद्र असून १ लाख ३ हजार ७१८ तर बारावी परीक्षा करिता १९७ परीक्षा केंद्र असून १ लाख २१ हजार २४४ विद्यार्थी परिक्षेस प्रविष्ठ होत आहेत. परीक्षा कामकाज २० परिरक्षक केंद्रामार्फत होणार आहे. शिक्षण विभागाच्या अंतर्गत भरारी पथक व आवश्यकतेप्रमाणे बैठे पथक नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच तालुका व मनपा स्तरावरून स्वतंत्रपणे भरारी व बैठे पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. महसूल विभागांतर्गत जिल्हाधिकारी यांच्यामार्फत भरारी पथके नेमण्यात आली आहे. या व्यतिरिक्त जिल्हा स्तरावरील खाते प्रमुख यांनी परीक्षा केंद्राना भेटी देण्यासंदर्भांत नियोजन करण्यात आले आहे.

परिक्षादरम्यान कॉपी अथवा इतर गैरप्रकार निदर्शनास आल्यास अशा विद्यार्थ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे तरी विद्यार्थी व पालकांनी दक्षता घ्यावी तसेच परीक्षा केंद्रावर गैरप्रकार निदर्शनास आल्यास परीक्षा केंद्र कायम स्वरुपी रद्द करण्यात येईल अशा सूचना प्रशासनामार्फत देण्यात आलेल्या आहेत, तसेच परीक्षा केंद्रावर केंद्रसंचालक व पर्यवेक्षक म्हणून काम करणाऱ्या शिक्षकांचे डिजिटल माध्यमातून फेसियल उपस्थिती घेण्यात येणार आहे. 'कॉपीमुक्त अभियान यशस्वी करण्यासाठी विशेष प्रयत्न म्हणून खालील बाबीची दक्षता घेण्यात येणार आहे.

१) जिल्ह्यातील संवेदनशील परीक्षा केंद्र परिसरामध्ये आवश्यकता असल्यास जिल्हा प्रशासनामार्फत ड्रोन कॅमेराद्वारे परीक्षा केंद्राची निगराणी करण्यात येईल.

२) परीक्षा सुरू होण्याअगोदर परीक्षा केंद्रावर आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध असण्याबाबत दक्षता घेण्यात येणार आहे.

३) परीक्षा केंद्राच्या बाहेर जिल्हा प्रशासनामार्फत आवश्यकतेनुसार व्हिडीओ चित्रीकरण करण्यात येईल.

४) जिल्हयातील सर्व विभागाचे शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने कॉपीमुक्त परीक्षा होण्यासाठी परीक्षा केंद्रांवर भरारी पथके व आवश्यकतेप्रमाणे बैठी पथके उपलब्ध होतील याचे नियोजन करण्यात आले आहे.

५) महाराष्ट्र प्रेवेंशन ऑफ मालप्रॅक्टिसेस अॅक्ट १९८२ या कायद्याची अंमलबजावणी करावी व कोणत्याही परीक्षा केंद्रावर गैरप्रकार घडल्यास गैरप्रकारांना उद्युक्त करणारे, मदत करणारे व प्रत्यक्ष गैरमार्ग करणाऱ्यांवर दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.

६) परीक्षा केंद्रापासून ५०० मीटर परिसरात झेरॉक्स सेंटर परीक्षा कालावधीत बंद ठेवण्यात येणार आहेत तसेच संबंधित परीक्षा केंद्राच्या परिसरात आवश्यकतेप्रमाणे १४४ कलम लागू करण्यात येईल.

# दुकानात चोरी करणाऱ्या चोरट्याला पोलिसांनी केले जेरबंद

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.०८, कल्याण :** कोळसेवाडी पोलीस स्टेशन हद्दीत दिनांक ०५/०२/२०२५ रोजी सकाळी ०५:३० वाजणेच्या सुमारास सुचकनाका परिसरातील चार दुकानांचे शटर उचकटुन चोरीचा प्रकार घडल्याने फिर्यादी सुशिल रामस्वभाव सिंग यांचे तक्रारी वरून अज्ञात इसमा विरूद् कोळसेवाडी पोलीस स्टेशन गु. रजि. नं. ११९/२०२५ भा.न्या.सं. कलम ३०५, ३३१ (४) प्रमाणे दिनांक ०५/०२/२०२५ रोजी दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा तांत्रीक तपास करून व गुप्त बातमीदार यांचे मार्फतीने गुन्हयातील अज्ञात आरोपीताचे नाव निष्पन्न करून आरोपी नामे राहल प्रकाश टाक वय ३० वर्षे, राह. व्हीटीसी ग्राऊंड, वाल्मीक नगर, उल्हासनगर ४ यास ताब्यात घेवुन त्याचेकडे तपास करता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्यास आज दिनांक ०८/०२/२०२५ रोजी गुन्हयात अटक करून त्याचेकडून सदर गुन्हयात चोरीस गेलेला लॅपटॉप रोख रक्कम व विठ्ठलवाडी पोलीस ठाणे हद्दीतून चोरीस गेलेला लॅपटॉप असे दोन लॅपटॉप व रोख रक्कम असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. वरील कामगिरी मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, कल्याण श्री. अतुल झेंडे, सपोआ. कल्याण विभाग श्री कल्याणजी घेटे यांच्या सुचना व मार्गदर्शनाखाली कोळसेवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश न्हायदे यांचे देखरेखीखाली सपोनिरी/ भालेराव, पोहवा/बुधवंत, पोहवा/कदम, पोशि/इंगळे यांनी केली आहे.

## संपादकीय



### गृहकर्ज, वाहनकर्ज स्वस्त होणार...

गेल्या पाच वर्षांत पहिल्यांदाच आरबीआय अर्थात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानं रेपो रेटमध्ये कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. रिझर्व्ह बँकेने याआधीची व्याजदर कपात थेट मे २०२०मध्ये जाहीर केली होती. याशिवाय गेल्या दोन वर्षांत आरबीआयनं व्याजदरात कोणतेही बदल केले नव्हते. आता मात्र आरबीआयकडून व्याजदर कपातीचा निर्णय जाहीर करण्यात आल्यामुळे त्याचा शेअर बाजारासोबतच भारतीय बाजारपेठेवर काय परिणाम होतो, यावर अर्थतज्ज्ञांमध्ये चर्चा सुरू झाली आहे.

**किती झाली व्याजदर कपात?**

रिझर्व्ह बँकेच्या सहा सदस्यीय मोनेटरी पॉलिसी कमिटी अर्थात सीपीसीच्या शुक्रवारी झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार आरबीआयने २५ बेसिस पॉइंटने व्याजदरात कपात केली आहे. त्यामुळे आता व्याजदर ६.५० टक्क्यांवरून ६.२५ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. केंद्र सरकारनं यंदाच्या अर्थसंकल्पात १२ लाखांपर्यंतचं उत्पन्न करमुक्त करण्याची घोषणा केल्यानंतर आठवड्याभरातच आरबीआयनं व्याजदर कपातीचा निर्णय जाहीर केला आहे. त्यामुळे आगामी काळात गृह व वाहन कर्जे स्वस्त होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

**गुंतवणूक, खर्च वाढवण्यावर भर**

आरबीआयच्या एमपीसी बैठकीत झालेला हा निर्णय कर्ज स्वस्त होण्यासाठी कारणीभूत ठरण्याची शक्यता आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत घरासाठी घ्यावे लागणारे कर्ज, वाहनासाठी घ्यावे लागणारे कर्ज यांच्यावरचे व्याजदर कमी होण्याची शक्यता आहे. अर्थात, ही कर्जे महाग होऊ शकतात. अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी या माध्यमातून लोकांच्या हाती जास्त पैसा शिल्लक राहिल्यामुळे त्यातून गुंतवणूक वाढू शकते, बाजारात पैसा येऊ शकतो, असा अंदाज वर्तवला जात आहे.

हा निर्णय जाहीर करताना आरबीआय चे गव्हर्नर संजय मल्होत्रा म्हणाले, गेल्या काही वर्षांत या पद्धतीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेला मोठा फायदा झाला आहे. विशेषत: करोना काळातील आव्हानांचा भारतीय अर्थव्यवस्थेला सामना करता आला आहे. यानंतर सरासरी महागाईचा दर कमी झाला आहे. व्याजदरासंदर्भातील या धोरणाचा अवलंब केल्यानंतर आरबीआयकडून नियोजित पद्धतीनेच मार्गक्रमण करण्यात आलं, असं ते म्हणाले.

**जागतिक बाजारपेठेत काय घडतंय?**

दरम्यान, गेल्या काही दिवसांत जागतिक बाजारपेठेत घडत असलेल्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर रिझर्व्ह बँकेच्या या निर्णयाकडे पाहिलं जात आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी नवे टेरिफ प्लॅन जाहीर केल्यानंतर जागतिक बाजारपेठेत अस्वस्थता निर्माण झाली आहे. कॅनडा, मेक्सिको आणि चीनसाठी हे टेरिफ दर जाहीर झाले. त्यापैकी कॅनडा आणि मेक्सिकोवरील टेरिफ दर लागू करण्याची प्रक्रिया एक महिन्यासाठी पुढे ढकलण्यात आली आहे. मात्र, या अनिश्चिततेमुळे डॉलर मोठ्या प्रमाणावर वधारला असून जगातील इतर मोठ्या चलनांनी नांगी टाकली आहे. भारतीय रुपयानं ८७ या आत्तापर्यंतच्या नीचांकापर्यंत घसरण नोंदवली आहे.

**देशाचा आर्थिक विकासदर ६.७ टक्के!**

दरम्यान, RBI च्या MPC बैठकीतील चर्चेनंतर देशाचा आर्थिक विकासदर ६.७ टक्के इतका अंदाजित करण्यात आला आहे. त्याशिवाय, घाऊक बाजारपेठेतील महागाईचा दर हा ४.२ टक्क्यांच्या आसपास राहील, असं गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी जाहीर केलं आहे.

# 'कॉपी'ची कुप्रथा



राज्यात बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारीपासून तर इयत्ता दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारीपासून सुरु होत आहे. प्रत्येकाच्या शैक्षणिक जीवनात या दोन्ही परीक्षा अत्यंत महत्वाच्या मानल्या जातात. नोकरीकरिता 'बायोडेटा' बनवताना त्यामध्ये दहावी आणि बारावीची टक्केवारी नमूद करण्याची प्रथा फार पूर्वीपासून चालत आलेली आहे. या परीक्षेतील टक्केवारीनुसार माणसाच्या बौद्धिक क्षमतेची कल्पना 'बायोडेटा' पाहणाऱ्याला येते. शिवाय या दोन्ही परीक्षा नेहमीच्या शाळा आणि महाविद्यालयांत न होता या परीक्षांसाठी अन्य केंद्रात जावे लागत असल्याने विद्यार्थ्यांवर अपरिचित वातावरणात परीक्षा देण्याचा ताणही असतो. परीक्षा काळात समस्त परिक्षाकेंद्रात पोलीस शिपाई नियुक्त केले जातात, कॉपी करण्याच्या प्रथेवर आळा घालण्यासाठी शासनाचे भरारी पथक कार्यरत असते. शाळेतील पर्यवेक्षकांचे विद्यार्थ्यांच्या हालचालींवर बारीक लक्ष असते. यंदाच्या या दोन्ही परीक्षा कॉपीमुक्त करण्यासाठी राज्याचे सरकार राज्यभर मोहीम राबवणार आहे. राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी तसे आदेश संबंधितांना दिले आहेत. परीक्षा केंद्रांवर नजर ठेवणासाठी यंदा ड्रोनचाही वापर केला जाणार आहे. या दोन्ही परीक्षा कॉपीमुक्त करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री स्वतः जातीने लक्ष घालत आहेत. परीक्षा केंद्रात गैरप्रकार घडल्यास तत्परतेने गुन्हा नोंदवण्यात येणार आहे. परीक्षा केंद्राच्या ५०० मीटर परिसरातील झेरॉक्स सेंटर्स परीक्षा काळात बंद ठेवण्यात येणार आहेत. परीक्षा केंद्राच्या परिसरात १४४ कलम लागू करण्यात येणार आहे.

या दोन्ही परीक्षांच्या कालावधीत दरवर्षी मोठ्या प्रमाणात कॉपी केली जाते, कॉपी करणारे विद्यार्थी आणि विद्यार्थ्यांना कॉपी पुरवणारे त्यांचे हितचिंतक कॉपी करण्याच्या आणि कॉपी पुरवण्याच्या विविध क्लुप्त्या शोधून काढतात. दरवर्षी परीक्षाकाळात प्रतिदिन यासंदर्भातील बातम्या वाचायला मिळतात. काही ठिकाणी आपल्या शाळेचा निकाल चांगला लागावा यासाठी पर्यवेक्षक शाळेतील मुलांना पुस्तके पुरवतात. काही ठिकाणी तर बोर्डाच्या परीक्षेच्या काळात ठराविक कमिशनच्या मोबदल्यात थेट बाकापर्यंत कॉपी पुरवणाऱ्या टोळ्या सक्रिय झालेल्या पाहायला मिळतात. या मंडळींनी पोलिसांपासून शाळेच्या पर्यवेक्षकांनाही 'मॅनेज' केलेले असते. बोर्डाच्या परीक्षेकरिता एका बाकावर एकच विद्यार्थी बसवण्याची सक्ती असताना परीक्षा केंद्रांमध्ये २ विद्यार्थ्यांना एकाच बाकावर बसवून एकमेकांच्या संगनमताने पेपर सोडवण्याची अनुमती दिल्याचा प्रकार मागच्या वर्षी संभाजी नगरात घडला होता. काही ठिकाणी पेपर सोडवण्याचा कालावधी संपण्याच्या काही मिनिटे अगोदर विद्यार्थ्यांना कॉपी करण्याची, एकमेकांना उत्तरे विचारण्याची अनुमती दिली जाते. काही शाळांमध्ये शाळेच्या खिडक्यांबाहेर विद्यार्थ्यांना कॉपी पुरवणाऱ्यांची जत्रा भरलेली असते. यांना पोलीसही हटकण्याची तसदी घेत नाहीत. काही विद्यार्थी तर कॉपी करण्यात अगदीच पटाईत असतात त्यांना इतका आत्मविश्वास असतो कि ते परीक्षेसाठी कधीही अभ्यास न करता मिळालेला संपूर्ण वेळ कॉपी तयार करण्यामध्ये घालवतात. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान नको म्हणून काही ठिकाणी पर्यवेक्षक स्वतःच विद्यार्थ्यांना प्रश्नांची उत्तरे सांगतात किंवा कॉपी करण्याची खुली अनुमती देतात. सरकारने यंदा ज्या पद्धतीने सिद्धता केली आहे ते पाहता यंदा कॉपी करण्यावर बऱ्याच प्रमाणात आळा बसेल असे म्हणण्यास हरकत नाही.

मुलांचे वय हे संस्कारक्षम असते. लहान वयात होणारे संस्कारच त्यांचे भवितव्य ठरवत असतात. शालेय जीवनात परीक्षेत कॉपी करून उत्तीर्ण होण्याची सवय जडलेले महाभाग पुढील आयुष्यातही यश मिळवण्यासाठी 'शॉर्टकट'चा किंवा गैरमार्गाचा अवलंब करू पाहतात. पौगंडावस्थेत असतानाच कॉपी करण्याची सवय लागल्याने भविष्यात असे करण्यात काही चुकीचे आहे असेही त्यांना कधी वाटत नाही. कॉपी केल्यामुळे आपण परीक्षा उत्तीर्ण होऊ मात्र पुढील व्यवहारिक जीवनात परीक्षेचे प्रसंग हे पदोपदी येणार आहेत त्यावेळी आपल्या बुद्धिमत्तेची आणि विवेकाची कसोटी लागणार आहे, तेव्हा आपल्याला कोण साहाय्य करणार ? कॉपी करणे म्हणजे निव्वळ आपल्या स्वार्थासाठी गैरमार्गाचा अवलंब करणे. कॉपी करणे म्हणजे ज्या विद्यार्थ्यांनी वर्षभर प्रामाणिकपणे आणि नेटाने अभ्यास केला आहे त्यांच्यावर अन्याय करणे. कॉपी करणे म्हणजे स्वतःला गुन्हेगारीची सवय लावून घेणे. कॉपी करणे म्हणजे मेहनतीला डावलून शॉर्टकट शोधण्याची सवय अंगीकारणे . वर्षभर अभ्यास करून परीक्षेला आनंदाने सामोरे जाणे ही नैतिकता आहे, तर वर्षभर उनाडक्या करून ऐन परीक्षेच्या काळात अभ्यास झाला नाही म्हणून कॉपी सारख्या गैरमार्गाचा अवलंब करणे ही अनैतिकता आहे. परीक्षेचे पेपर सोडवण्यासाठी अनैतिक मार्गाचा अवलंब करण्याची सवय विद्यार्थ्यांना पुढील आयुष्यात भ्रष्टाचाराने आणि गैरमार्गाने धन कमावण्याची सवय लावते. गुन्हेगारी क्षेत्रात विद्यार्थ्यांचे आणि उच्चशिक्षितांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन शाळांमध्ये नीती आणि नैतिक मूल्ये यांचे शिक्षण देणे मध्यंतरी अनिवार्य करण्यात आले होते. पुस्तकी ज्ञानातून विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास साधत असला तरी मानसिक आणि भावनिक विकासासाठी तसेच योग्य-अयोग्य, नैतिक-अनैतिक यांविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता येण्यासाठी शालेय जीवनात नीती आणि नैतिक मूल्ये यांचे शिक्षण देणे अत्यंत महत्वाचे आहे. आजमितीला हा विषय शिकवण्याकरिता अनेक शाळांनी शिक्षकच नियुक्त केलेले नाहीत. बऱ्याच शाळांमध्ये या विषयाच्या तासिकेत विद्यार्थ्यांना अन्य विषय शिकवले जातात, एकूणच या विषयाला शाळांकडून दुय्यम स्थान देण्यात येत आहे. बालपणापासून विद्यार्थ्यांमध्ये नैतिक आणि अनैतिक गोष्टींविषयी सजगता आली कि मुले कॉपीसारख्या कुप्रथेच्या आहारी जाणार नाहीत.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## एकाच दिवशी मायलेकाचे निधन

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.८, विंचूर (नाशिक) :** नाशिक जिल्ह्यातील येवला येथे एक दुःखद घटना समोर आली आहे. पैठणीचे कारागीर कै. मुकुंद पांडुरंग सदावर्ते यांचं अल्पशा आजाराने सकाळी निधन झालं. ही बातमी त्यांच्या आईला कळताच त्यांना धक्का बसला. या मुलावर त्या अती प्रेम करत असे. आणि त्यांना हा धक्का सहन झाला नसल्याने. कै.रुक्मिणी पांडुरंग सदावर्ते यांनी आपला प्राण सोडला. या दोघा मायलेकांचे एकाच दिवशी निधन झाल्याने, येवला शहरावर व हिंदू नामदेव शिंपी समाजावर शोककळा पसरली, आणि एकाच वेळी दोघा मायलेकांची अंत्ययात्रा काढण्याची वेळ येवला शहरवासीयांवर व नातेवाईकांवर आली.

### दिल्ली..

सुटत चालला गुंता
कुणाची बा दिल्ली
अधिकचौकस बने
मतदाते पहा हल्ली

सुस्पष्ट बहुमतदिले
ना झुके एककल्ली
डरकाळी फोडणारे
होऊन जाई बिल्ली

ईव्हीएम मशीन तव
पुन्हा उडेलं खिल्ली
काही तरी गडबडी
बरळू लागती टल्ली


भ्रष्टाचाराचा धुळीत
प्रदुषित सारी गल्ली
झाडता सगळी धूळ
कंबर झाली ढिल्ली

स्वच्छतेच्यागप्पामधे
भोवलेली मुंगफल्ली
निकाललावे निकाल
मतदार समर्थ वल्ली

विरघगळे स्वप्नरंजन
हतबल शेख चिल्ली
एवढे नक्की निश्चित
जनता हाता किल्ली

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# विश्वरचियेता - प्रभू विश्वकर्मा



विश्वरचियेता प्रभू विश्वकर्मा म्हणजे समस्त देवतांचे कारागीर आहे. विश्वकर्मा वंशज म्हणून ज्या पाच समाजांची ओळख आहे, ते सुतार, लोहार, सोनार, ताम्रकार व शिल्पकार हे पाचही समाजबांधव महाराष्ट्रात पांचाळ म्हणून ओळखले जातात. दक्षिण भारतात हाच समाज विश्वब्राह्मण म्हणून, तर उत्तर भारतात विश्वकर्मा समाज म्हणून परिचित आहे. हा समाज प्रामुख्याने कारागिरी करणारा आहे.अर्थात ह्या समाजाच्या अंगी नवनिर्माणक्षमतेचे गुण आहेत.आजही विश्वाच्या प्रत्येक नवनिर्मितीच्या ठायी प्रभू विश्वकर्माचा वास आहे.म्हणून भगवान प्रभू विश्वकर्माची प्रत्येक करागिरीच्या ठिकाणी पूजन केले जाते. त्यामुळे त्यांना देवतांचा कारागीर तथा विश्वरचियेता हे संबोधन रुढ झाले आहे. हिंदू धर्माचा इतिहास मानल्या जाणाऱ्या वेद, पुराण, उपनिषदे, व अन्य संस्कृत ग्रंथांचा अभ्यास व संशोधन केले असता भगवान श्री प्रभू विश्वकर्मा हे केवळ देवतांचे कारागीर नसून सृष्टिनिर्मितीची बीजे निर्माण करणारे जड व चेतन अश्या घटकांचे विश्वनिर्माते आहे हे सिद्ध झाले आहे. त्यासंदर्भात

पौरुषेय प्रवर विधि' चा या संस्कृत वायमयात एक श्लोक आहे. न भूमिर्न जलं न तेजो न च वायव:। न चाकोशे न चितंच न युध्दया प्राण गोचर:। न च ब्रम्ह न विष्णुक्ष न च तारका:। सर्व शून्य निरावलम्बे स्वयंभू विश्वकर्मा।। अर्थात जमीन नव्हती, पाणी नव्हते, प्रकाश नव्हता, आकाश नव्हते आणि वायूही नव्हता, तारकाही नव्हत्या, ब्रम्हा, विष्णूही नव्हते. सर्व शून्य असताना केवळ एक आणि एकच प्रभू विश्वकर्मा अस्तित्वात होते. शिवपुराणातील उल्लेखानुसार भगवान शंकराने पार्वतीला सांगितले की, पंचवदन प्रभू विश्वकर्मा हेच परमात्मा आदिपुरूष आहे. सृष्टीनिर्माता तेच आहे. त्यांच्या संकल्पनेतून सुरूवातीला सृष्टी निर्माण करण्यासाठी जे जे उत्पन्न करावेसे वाटत होते. ते ते निर्माण करून ठेवले. पुराणानुसार प्रभू विश्वकर्माच्या पाच मुखांपासूनच चौदा भुवने, पंचमहाभुते, पंच तन्मात्रा, पंचदेव व पंचपुत्र निर्माण झालेत. परमात्मा विश्वकर्माच्या पूव मुखाचे नाव सद्योजात' आहे. दक्षिणेकडील मुखाचे आहे. उत्तरेकडील मुख ईशान' नावाने ओळखले जाते. तर ऊर्ध्वमुखाला तत्पुरुष' हे नाव आहे. प्रभू विश्वकर्माच्या स्वरूपाबाबत एक श्लोक स्कंदपूराणात आहे. या श्लोकात म्हटले आहे की, सर्वदष्टीधारक असलेला भगवान विश्वकर्मा हंसावर आरूढ व शुभमुकूट धारण केलेल्या आहे. हा परमपिता वृद्धकाया असून त्याच्या हातात कम्बासूत्र, जलपात्र, पुस्तक व ज्ञानसुत्र आहे. भगवान विश्वकर्माचे विविध अवताराचे उल्लेख श्रीमद्भागवत महापुराण, वायुपुराण, ब्रम्हांड पुराण, भविष्य पुराण, हरिवंश पुराण, स्कंदपुराण, महाभारत आदि ग्रंथात आहेत. वेगवेळ्या राज्यांत त्या त्या अवतारांचे जन्मदिन साजरे होतात. कामगार संघटनाही वेगळ्या दिवशी विश्वकर्मा जयंती साजरी करतात. महाराष्ट्र, दक्षिण भारत व उत्तर भारतातील काही राज्यातील पांचाळ समाज माघ शु.त्रयोदशीला जयंती साजरी करतात. भगवान विश्वकर्माची पाच मुले असून त्यांची नावे मनु, मय, त्वष्टा, तक्ष आणि शिल्पी अशी असून ते ब्रहार्षी होते तक्षलाच काही सस्कृंत वाययात दंवज्ञ, विश्वज्ञ असेही म्हटले आहे. ही पाच मुलेच शिल्पशास्त्राचे प्रवर्तक आहेत. याच पाच मुलांनी पाच वेगवेगळ्या शिल्पकारी व्यवसायाला प्रांरभ केला. मनु ब्रम्हर्षीपासून लाकडावर कलाकारी करणाऱ्या सुतारांची वंशावळ सुरू झाली. मय ब्रह्मर्षीपासून तांबे, पितळ यावर कलाकारी करणाऱ्या ताम्रकारांची वंशावळ सुरू झाली. तक्ष/ दैवेज्ञ/ विश्वज्ञ ब्रह्मर्षीपासून सोन्या चांदीवर कलाकारी करणाऱ्या सोनारांची वंशावळ सुरू झाली आणि शिल्पी ब्रह्मर्षीपासून दगडावर कलाकारी करणाऱ्या शिल्पकारांची (पाथरवट) वंशावळ सुरू झाली. विश्वकर्मात्मज समाजालाच विश्वब्राह्मण, पांचाळब्राह्मण, कामलार, जांगीडब्राह्मण, रथकार, तरखान, स्वपती, नारांशस अशी विविध नावांनी अन्य राज्यांमध्ये ओळखले जाते. महाराष्ट्रात हा समाज पांचाळ म्हणून ओळखला जातो. हा समाज गळ्यात जानवे घालतो म्हणून काही ठिकाणी जानवेसमाज म्हणूनही या समाजाला ओळखतात. ग्राम रचनेनुसार प्रत्येक गावात ह्यासमाजातील लोक राहतात कारण पूर्वी खेड्यातील गरजा ह्या खेड्यातच भागायच्या. हा समाज विशेषतः भूमिहीन आहे परंतु शेती कसण्यासाठी लागणारी अवजारे तो शेतीसाठी पुरवायचा तर त्या बदल्यात त्यांनी वर्षभराचे पुरेल एवढे धान्य व घरपयोगी वस्तू द्यायचे त्याला आसामी म्हणायचे. त्याचबरोबर लोहार समाजसुध्दा व्यवसायिक व शेतकऱ्यांना लोखंडी वस्तू द्यायचा व त्या बदल्यात त्यांना वस्तू मिळायच्या. ताम्रकर व शिल्पकार समाजातील कारागीर सर्व समाजातील लोकांना शुभ प्रसंगी त्यांच बरोबर घरातील शोभेच्या वस्तू बनवून द्यायचा. त्याचप्रमाणे सुवर्णकार लग्नप्रसंगी असो इतर सांस्कृतिक कार्यक्रम प्रसंगी सुवर्ण अलंकार बनवून द्यायचा अर्थात हा पांचाळ कारागीर समाज समाजातील लोकांच्या गरजा भागवायचा. त्याच्या कला व कौशल्यातून गाव व खेडे समृद्ध झाले असून यामध्ये त्यांची मुख्य भूमिका आहे. पूर्वी वस्तूविनिमय पद्धती होत्या. आजच्या काळातही हिच परिस्थिती आहे मात्र वस्तूविनिमय पद्धती ऐवजी कामाच्या बदल्यात पैशाचे चलन आले आहे. कारण बदलत्या काळानुसार व्यक्तीच्या गरजा बदलत आहे. त्यामुळे इतर दैनंदिन गरजा भागवण्यासाठी पैशाची अवश्यकता भासते.मात्र अजुनही या पांचाळ समाजाचे विश्वासाठी तेवढेच समर्पण आहे.

विश्वरचियेता प्रभू विश्वकर्मा यांच्या नावे केंद्रसरकारमार्फत विश्वकर्मा पूजन दिनानिमित्त १७ सप्टेंबर २०२४ रोजी कारागीर आणि शिल्पकारांना मदत करण्यासाठी पीएम विश्वकर्मा ही योजना सुरू करण्यात आलीआहे. देशातील १४० हून अधिक जातींच्या लोकांना या योजनेचा लाभ होत आहे. या योजनेद्वारे कारागिरांना कमी व्याजदरात ३ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज दिले जाते. अश्याप्रकारे समस्त विश्वाला त्यांच्या दिव्य संकल्पनेतून व कला- कौशल्यातून सुबक व आकर्षक करणाऱ्या विश्वरचियेता प्रभू विश्वकर्मा यांना जयंती निमित्त विनम्र अभिवादन.....!

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि. बुलडाणा**
**मो.९७६३२८२०७७**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यासाठी विचार विनिमय बैठक

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०८, पनवेल :** महानगरपालिकेच्या माध्यमातून लोकसहभागातून छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात सालाबाद प्रमाणे यंदाही साजरी करण्यात येणार आहे. यासाठीची विचार विनिमय बैठक सोमवार, दिनांक १० फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी ०४.३० वा. आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाटयगृह येथे आयोजित करण्यात आली आहे. बुधवार, दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती महानगर पालिकेच्या माध्यमातून लोकसहभागातून साजरी करण्यात येणार आहे. यासाठी विचार विनिमय करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव मंडळाचे पदाधिकारी, उत्सव समिती सदस्य व शिवजयंती उत्सव, मंडळांचे अध्यक्ष, विविध संस्थांचे पदाधिकारी व कार्यकर्ते, मनपातील माजी पदाधिकारी, माजी सभागृह नेते, माजी विरोधी पक्षनेते, माजी नगरसेवक, शाळेचे मुख्याध्यापक, वीज मंडळाचे कार्यकारी अभियंता, वाहतुक शाखेचे अधिकारी, पोलिस निरिक्षक, पोलीस अधिकारी तसेच पनवेल नगरी मधील नागरीक आदी सर्वांची बैठक सोमवार, दिनांक १० फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी ०४.३९ वाजता महापालिकेच्या आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाटयगृह येथे आयोजित करण्यात आलेली आहे. या बैठकीस छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव मंडळे, विविध शैक्षणिक व इतर संस्था, ट्रस्ट, कामगार संघटना, नागरिक यांनी उपस्थित रहावे असे उपस्थित रहावे असे आवाहन महापालिकेच्यावतीने आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

## चांदवड विभागीय कार्यालयातील बाह्य स्रोत कर्मचाऱ्यांना सुरक्षा साधनांचे मार्गदर्शन



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०८, विंचूर (नाशिक) :** चांदवड विभागीय कार्यालयातील बाह्य स्रोत कर्मचारी यांना विजसुरक्षा साधनांचा वापर व सुरक्षा उपाययोजना याविषयी मार्गदर्शन करण्याचा कार्यक्रम चांदवड विभागीय कार्यालयाचे कार्यकारी अभियंता केशव काळु माळी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अतिरिक्त कार्यकारी अभियंता राठोड प्रशिक्षण केंद्र एकलहरे यांनी सुरक्षा पर विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले तसेच त्यांच्यासोबत प्रशिक्षण केंद्र एकलहरे येथील शेख यांनी देखील मार्गदर्शन केले. चांदवड योग्य कार्यालयाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता सुनिल रहिज यांनी कर्मचाऱ्यांना सुरक्षाविषयक योग्य प्रकारे मार्गदर्शन केले. तसेच सदर कार्यक्रमाच्या वेळी बाह्य स्रोत कर्मचारी यांना मुख्य कार्यालयाच्या आदेशाने त्यांचे वेतन हे एचडीएफसी बँकेत जमा करण्याबाबत जे काही परिपत्रक आले होते. त्या संदर्भात एचडीएफसी बँक मुंबई शाखेचे प्रमुख शेख यांनी देखील कर्मचाऱ्यांना पगार खाते संदर्भात सविस्तर माहिती दिली. व मोठ्या प्रमाणात बाह्य कर्मचारी यांनी एचडीएफसी बँकेत यावेळी आपल्या खाते उघडले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिनेश जोशी उच्च स्तर लिपिक मासे यांनी केले. सदर कार्यक्रमास चांदवड विभागीय कार्यालय अंतर्गत असणारे बाह्य स्रोत कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व कर्मचाऱ्यांनी सुरक्षा साधना वापरणे विषयक शपथ घेण्यात आली.

## शिळगावातील ठामपा शाळेत विद्यार्थ्यांची पाण्यासाठी वणवण !

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, शिळफाटा (ठाणे) :** शिळगावातील शाळा क्रमांक ८१, शाळा क्रमांक २६ या दोन्ही शाळा एकाच इमारतीत सकाळ आणि दुपार अशा वेळी भरतात. या दोन्ही शाळेची पटसंख्या १ हजार २०० च्या वर असून सरासरी उपस्थिती ८७% असते. या दोन्ही शाळा ठाणे महानगरपालिकेच्या आहेत. मुख्याध्यापक यांनी निवेदन देऊन सुद्धा ठाणे मनपा पाणीपुरवठा अधिकारी या पत्राची दखल घेत नाही. विद्यार्थ्यांना पाणी पिण्यासाठी मिळत नाही. विद्यार्थ्यांना आपली तहान भागवण्यासाठी घरून पाणी घेऊन जावे लागत आहे.यासाठी शाळा क्रमांक ८१ चे गटप्रमुख अध्यक्ष उमाकांत कुडे सतत पाठपुरवठा सुद्धा करत आहे. तरीसुद्धा या पत्राची ती दखल घेत नव्हते. ही माहिती त्यांनी भारतीय जनता पार्टीचे कल्याण विधानसभा सुपर वारिर्यस विनोद वास्कर यांना दिली दिली. भारतीय जनता पार्टीचे कल्याण विधानसभा सुपर वारिर्सय विनोद वास्कर यांनी ठाणे महानगरपालिकेचे वरिष्ठ पाणीपुरवठा अधिकारी विनोद पवार यांच्याशी संपर्क साधला. तसेच सहाय्यक आयुक्त भालचंद्र घुगे यांच्याशी फोनवरून संपर्क साधला असतात दोन्ही अधिकाऱ्यांनी लवकरच या पत्राची दखल घेऊन. शाळेला पाणीपुरवठा कसा करता येईल यासाठी उपाययोजना करू असे आश्वासन त्यांना देण्यात आला आहे. आता किती दिवसात अधिकारी दखल घेतात ते पाहायचं ठरणार आहे.

## एमआयडीसी भागात ही सखोल स्वच्छता मोहीम

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०८, नवी मुंबई :** स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत दुर्लक्षित जागांच्या स्वच्छतेकडे महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी एमआयडीसी भागात केलेल्या पाहणी दौऱ्याच्या अनुषंगाने विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. त्यानुसार आज अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली दिघा व कोपरखैरणे विभागात विशेष स्वच्छता मोहिमा राबविण्यात आल्या. परिमंडळ २चे उपआयुक्त डॉ.कैलास गायकवाड व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे परिमंडळ २ उपआयुक्त संतोष वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली या मोहिमा राबविण्यात आल्या.यामध्ये दिघा विभागात विभाग अधिकारी भरत धांडे व स्वच्छता अधिकारी थोरात यांच्यासह स्वच्छता कर्मी आणि अधिकारी, कर्मचारीवृंदाने मुकंद चौक ते रेल्वे ब्रीज या भागातील अधिक रहदारीचा रस्ता, पदपथ, दुभाजक आणि दोन्ही बाजूकडील परिसर सखोल स्वच्छ केला. यामध्ये रस्त्यावरील माती खरडून काढून व उचलून घेऊन धूळीचे प्रमाण रोखण्यासाठी ठोस कार्यवाही करण्यात आली. अशाच प्रकारे कोपरखैरणे विभागातही विभाग अधिकारी वसंत मुंडावरे आणि स्वच्छता अधिकारी राजुसिंह चव्हाण आणि त्यांच्या सहकारी समूहाने स्वच्छताकर्मीसह पावणे एमआयडीसीतील मुख्य रस्त्यावर सखोल स्वच्छता मोहिम राबविली. सखोल स्वच्छता मोहिमेद्वारे स्वच्छतेसोबतच धुळीचे प्रमाण कमी करुन हवा गुणवत्तेला पयार्याने पर्यावरणाला प्राधान्य देण्यात येत आहे.

# साप्ताहिक राशिफल ०९ ते १५ फेब्रुवारी २०२५



**मेष रास -** या सप्ताहात मेष राशीच्या लोकांमध्ये पॉझिटिव्हिटी चे प्रमाण वाढेल. तुमच्या करिअरसाठी ही हा सप्ताह अनुकूल आहे. नवीन नोकरी शोधणाऱ्यांना नवीन नोकरी मिळेल. पुढे जाल. प्रयत्न मात्र सतत करत रहा. तुमच्या व्यापारातही तुम्हाला सफलता मिळेल. तुमच्या व्यापारात तुमच्या चांगला जम बसेल व विक्रीही होईल. रागावर मात्र नियंत्रण ठेवावे लागेल. या सप्ताहात धनस्थिती उत्तम आहे, पण त्याचबरोबर धन खर्चही आहे. अधिकचि आवक होईल. अनावश्यक खर्च टाळावेच लागतील. तसेच तुमच्या मुलांसंबंधीत तुमच्या संतती संबंधित तुम्हाला उत्तम वार्ता समजतील. तसेच सप्ताहाच्या मध्यानंतर तुमच्या जीवनसाथी सोबत काही वाद होण्याची शक्यता आहे. रिलेशनशिप व करियर दोन्हीही सामान्य पण छान असेल. सप्ताहाच्या शेवटी इन्कम टॅक्स भरावा लागेल. तुमच्या क्लाईंटशी व वरिष्ठांशी वाद होतील. संमिश्र स्वरूपाचा हा सप्ताह जाईल.

**वृषभ रास-** या सप्ताहात तुमच्यातील धार्मिकता वाढेल. तुम्ही एखाद्या गुरूच्या आश्रमालाही भेट द्याल, किंवा तीर्थयात्रा होईल. एल आय सी सारख्या एखाद्या विमा पॉलिसी मध्ये तुम्ही गुंतवणूक करू शकाल. धनस्थिती छान आहे त्यामुळेच तुम्हाला घराचे रिनोवेशन करण्यात रुची वाढेल. तुमच्या करियर मध्ये तुम्हाला खूप मेहनत करावी लागेल. मार्केटिंग मध्येही उत्तम लाभ होतील. तुमच्या संततीला इन्फेक्शन चे व पोटाचे विकार जाणवतील. तुमचे वरिष्ठ तुमच्यावर नाराज होतील व तुम्हाला सरकारी कामकाजासाठी खूप फेऱ्या माराव्या लागतील. पण तरी तुम्ही आनंदी असाल व आपल्या कुटुंबासाठी काही खरेदी कराल. या सप्ताहात तुम्ही खूप व्यस्त सुद्धा असाल पण तरीही रिलेशनशिप छान राहील.

**मिथुन रास -** हा सप्ताह खूप छान जाईल. रिलेशनशिप साठी हा सप्ताह खूप छान असेल. तुमचे आप्तेष्ट, मित्रमंडळी किंवा तुमचा पार्टनर तुमच्यावर नाराज असेल तर त्यांना मनवण्याचे काम या सप्ताह तुम्हाला करावे लागेल. धनस्थिती खूप छान राहील तुम्ही केलेल्या मेहनतीचे फळ तुम्हाला आता मिळेल. तुमचे अडकलेले सर्व पैसे परत मिळतील. पण खाण्यापिण्याकडे लक्ष द्या कारण पोटाचे विकार होण्याचे योग आहेत. तुमच्या जीवनसाथी सोबत तुम्ही तीर्थयात्रेला जाऊ शकता. या सप्ताहात तुमच्या जीवनसाथीचे पद प्रमोशन होण्याचे योग आहेत. सप्ताह संमिश्र असल्यामुळे कामात अडचणी खूप येतील पण खूप मेहनत करून तुम्ही त्या अडचणीवर मात कराल.

**कर्क रास -** या सप्ताहात तुमचे आरोग्य खूप छान राहील. धन स्थिती ही छान असल्यामुळे तुम्ही सेविंग कडे लक्ष द्याल. काही सरकारी कामे रखडली असतील तर आता ती पूर्ण होतील .अडकलेले पैसे, उधार दिलेले पैसे परत मिळतील. तुमच्या कामांमध्ये तुमचे छान व्यवहार होतील ज्यायोगे तुम्हाला भरपूर धनलाभ होईल. प्रॉपर्टी खरेदी करण्याचे योग देखील आहेत. पण त्याचबरोबर तुम्हाला कानाचे विकार जाणवतील. दांपत्य जीवनही छान असेल पण तुमच्या जीवनसाथीचे आरोग्य खराब होण्याची शक्यता आहे. तुमच्या करिअरसाठी हा आठवडा खूप चांगला आहे. तुमच्या कामांमध्ये लागणारी एखादी इलेक्ट्रॉनिक ची वस्तू तुम्ही खरेदी कराल, एखादी मशीन किंवा कम्प्युटर. नवीन नवीन योजना आणल. त्यामुळे हा सप्ताह करिअर साठी खूप छान आहे, त्यात तुम्ही नवीन काहीतरी करू शकाल.

**सिंह रास -** या सप्ताहात तुम्हालाच तुमच्या रोजच्या जीवनामध्ये काही बदल करावेसे वाटतील. तुम्ही तुमच्या खाण्यापिण्याच्या सवयीही बदलाल. तुमच्या राशीमध्येच बुधादित्य योग होत असल्यामुळे तुमची धनस्थिती अतिशय उत्तम राहील. तुमच्या कामा संबंधित एखादी डील असेल तर ती आता पूर्ण होईल व तुम्हाला अधिकची आय मिळेल. यापूर्वी कोणाला उदार पैसे दिले असतील तर ते अथवा कामांमध्ये अडकलेले पैसे आता पुन्हा मिळतील. तुमच्या वाहनावर मात्र काही खर्च होईल. तुम्हाला हातापायाचे दुखणे किंवा डोकेदुखी जाणवेल, तसेच तुमच्या घरामध्ये काहीतरी रिनोवेशन करण्याचे तुम्हाला सुचेल. तुमच्या पार्टनरचा मात्र या सप्ताहात मूड खूप चांगला नसेल, पार्टनर चे पद प्रमोशन होईल त्याला गुरुचा आशीर्वाद मिळेल.

**कन्या रास -** या सप्ताहात तुम्हाला तुमच्या खर्चावर खूप नियंत्रण करावे लागेल. उलट सुलट खाण्यामुळे तुम्हाला ऍसिडिटी अपचन होण्याची संभावना आहे. कंबरदुखी, पाठदुखी ही होऊ शकते. या सप्ताहात तुमची धनस्थिती खूपच नॉर्मल असेल त्यामुळे कोणालाही उधार पैसे देऊ नका, तसेच शेअर मार्केटमध्ये ही पैसे गुंतवू नका, कोणालाही ऑनलाइन पेमेंट करू नका. तसेच या सप्ताहात पार्टनर सोबत फिरायला जाण्याचे योग देखील आहेत, पण पार्टनर चे आरोग्य खराब होण्याची शक्यता आहे त्याला स्किन इन्फेक्शन होऊ शकते. करिअरसाठी मात्र हा सप्ताह खूप छान आहे पण तुमच्या कामासंबंधित काही मशिनरी असतील तर त्या खराब होण्याचे चान्सेस आहेत त्यामुळे काम उशिरा होईल. तुमची खूप धावपळ होईल पण कामे पूर्ण होतील.

**तुला रास -** या सप्ताहात तुमच्या डोक्यात फक्त काम आणि काम संबंधितच विचार असतील. या सप्ताहात तुमचे आरोग्य खराब होण्याची शक्यता आहे त्यामुळे गोड पदार्थ खाऊ नका. मधुमेह वाढू शकतो. शक्य झाल्यास सकाळी उठून चालायला जा. पण सप्ताह चांगला आहे. मंगळ नवमभावात असल्यामुळे विदेशातून धनलाभ होण्याची शक्यता आहे. तुमच्या कामांमध्ये तुमचे सेल्स व परचेस छान होईल. धनलाभ होतील. तुमच्या संतती संबंधित तुम्हाला काही आनंदी वार्ता समजतील. वैवाहिक जीवनही छान राहील. तुमच्या पार्टनरची मात्र खूप धावपळ होईल तो व्यस्त असेल. वाहन जपून चालवा अशी तुम्ही त्याला तंबी द्या. तुमच्या कामांमध्ये तुम्हाला एखाद्या स्त्री कडून झालेल्या व्यवहारात लाभ होईल.

**वृश्चिक रास -** तुमच्या करिअरसाठी व तुमच्या कामासाठी हा आठवडा खूप चांगला आहे. तुमच्या करियर मध्ये वाढ व कामांमध्ये वाढ करण्याच्या तुम्हाला अनेक अनेक कल्पना सुचतील. त्यासाठी तुम्ही नवीन व खूप अधिक प्रयत्न कराल. तुमचे आरोग्य मात्र या सप्ताहात खराब होणार आहे. एलर्जी, फूड इन्फेक्शन अशा प्रकारचे आजार संभवतात. या सप्ताहात तुमची धनस्थिती खूप छान आहे. अचानक धनलाभ होतील. आई-वडिलांच्या तब्येतीची मात्र काळजी घ्यावी लागेल. वैवाहिक जीवनही छान जाईल. तुमच्या पार्टनरला हा सप्ताह त्याच्या करिअरसाठी खूप छान असेल त्याच्या डील्स होतील नवीन कामेही त्याला मिळतील.

**धनु रास -** या सप्ताहात तुमच्या डोक्यामध्ये विचार फक्त करिअर आणि करिअरचेच असतील. तुमचे करिअर तुम्ही अपग्रेड करू शकाल. या सप्ताहात तुम्हाला वेळ मिळेल त्यामुळे तुम्ही जुने छंद देखील जोपासाल. या सप्ताहात तुम्हाला धनस्थिती मध्यम स्वरूपाची आहे व खर्चही तितकेच आहेत. कुठल्याही व्यक्तीला पैशाचे ट्रांजेक्शन करताना सांभाळून करा. तुम्हाला जे धनलाभ होतील ज्या नवीन डील्स मिळतील त्यामध्ये बारीक लक्ष द्या. कारण नुकसान होण्याची ही शक्यता आहे. तुमच्या व्यापारात तुम्हाला छान नवीन प्रोजेक्ट मिळतील. एखाद्या इलेक्ट्रॉनिक वस्तूवर खर्च होईल. तुमच्या पार्टनरला पोटाचे विकार जाणवतील पण रिलेशन मात्र छान असेल.

**मकर रास -** या सप्ताहात तुम्ही तुमच्या वरील कर्ज फेडण्याकडे लक्ष द्याल. पण या सप्ताहात तुमचे आरोग्य छान पण राहील व थोडे खराब पण होईल. पोटाचे विकार जाणवतात त्यामुळे खाणे -पिणे सांभाळा. याआधी कधी गुंतवणूक केली असेल तर त्यामधून आता धनलाभ होतील.जुने व्यवहार पूर्ण होतील, धनलाभाही होईल पण तुमच्या आई-वडिलांवर तुमचे धन खर्च होईल. तुमच्या मुलांसंबंधी तुम्हाला या सप्ताहात काहीतरी आनंदी बातमी मिळेल. या सप्ताहात तुमचा जीवनसाथी तुमच्यावर रागावून माहेरी जाण्याची शक्यता आहे. पण करिअर साठी आठवडा चांगला नाही, कामामध्ये अनेक बाधा येतील मशिनरींवर खर्च होतील.

**कुंभ रास -** या सप्ताहात तुमचेही आरोग्य थोडेसे खराबच राहील, पोटाचेच विकार संभवतात. त्यामुळे तुम्हीही खाण्यापिण्याच्या सवयी मध्ये बदल करा. रोजच्या जीवनात थोडा बदल करा. या सप्ताहात धनलाभ मात्र छान होईल. महत्त्वाच्या डील्स पूर्ण होतील. तुम्हाला तुमच्या मनावर मात्र पूर्ण ताबा ठेवायला हवा. कारण चुकीच्या गुंतवणुकीतून नुकसान होण्याची शक्यता आहे. तुमच्या जीवनसाथी सोबत परिवारासोबत तिथे यात्रेला जाण्याचे योग आहे. तुमच्या जीवनसाथी बरोबर तुमचे रिलेशन छान असेल व ते अधिक छान कसे राहील याकडे तुम्ही लक्ष द्याल. तुमच्या करिअर साठी हा सप्ताह खूप छान असला तरी खूप मेहनत करावी लागणार आहे.

**मीन रास -** या सप्ताहात तुम्ही तुमचे सर्व लक्ष तुमच्या आरोग्यावर द्याल. पण खाण्यापिण्यावर कंट्रोल ठेवा. तुमचा मधुमेह वाढण्याची शक्यता आहे. त्वचेचे विकार जाणवतात. उघड्यावरचे अन्न तथा गोड पदार्थ खाऊ नका. या सप्ताहात तुम्हाला वेगवेगळ्या गोष्टींमधून धनलाभ होण्याची शक्यता आहे. विदेशाशी संबंधित काही कामे असतील तर त्यातूनही तुम्हाला लाभच होईल. चांगल्या चांगल्या व मोठ्या डील्स असतील त्या तुम्ही पूर्ण करू शकाल. दाम्पत्य जीवनही छान राहील. तुमच्या पार्टनरला मात्र पाठ दुखी, कंबर दुखी चे प्रॉब्लेम जाणवतील. घर परिवारासाठी तुम्ही काही शॉपिंग कराल. व्यापार नोकरीमध्ये ट्रान्सफर संभवते. एकूणच करिअर साठी आठवडा उत्तम आहे.

**- देवयानी कुलकर्णी.**
**खारघर (रायगड)**

## विकासाचे राजकारणच देशाला महाशक्ती बनवू शकते; ८ व्या युवा संसद मध्ये मान्यवरांचे मत!

**अक्षराज : स्वामी दळवी**

**दि.०७, पुणे :** विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या आजच्या युगामध्ये एआय सारख्या तंत्रज्ञानामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार कमी होणार आहे, त्यामुळे तरुणांसमोर मोठे प्रश्न निर्माण होणार आहे. अशावेळी बेरोजगार तरुणांना रोजगार मिळवून देणे आणि त्यांचा देशाच्या विकासासाठी उपयोग करून घेणे हे सर्वात मोठे आव्हान आहे. धर्म जात आणि पंथ यांच्या पलीकडे जाऊन जर विकासाचे राजकारण झाले तरच भारत खऱ्या अर्थाने महासत्ता बनू शकतो, असे मत विविध क्षेत्रातील मान्यवरांनी व्यक्त केले. जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट तर्फे संस्थेच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या ८ व्या युवा संसद मध्ये 'व्हिजन भारत २०२९' या विषयावर विविध मान्यवरांनी आपली मते व्यक्त केली.

ज्येष्ठ पत्रकार निलेश खरे, ज्येष्ठ पत्रकार प्रसन्न जोशी, जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट चे उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर उपस्थित होते. यावेळी नगरसेवक राजेंद्र शिळीमकर, सुशील मेंगडे यांना आदर्श नगरसेवक पुरस्काराने गौरविण्यात आले. निलेश खरे म्हणाले, तंत्रज्ञान झपाट्याने बदलत आहे तंत्रज्ञानामुळे माणसाचे आयुष्य जरी सहज सोपे झाले असले तरी त्याच्या समोरील अडचणी मात्र वाढल्या आहेत. रोजगार झपाट्याने कमी होत आहेत, येत्या काही वर्षांमध्ये तीन लाख रोजगार कमी होणार आहेत, अशा वेळी बेरोजगार तरुणांच्या हाताला काम देणे हे देशासमोरील मोठे आव्हान आहे.




देशाचे उत्पादन क्षमता वाढविणे गरजेचे आहे कार्यकर्ता हा कार्यकर्ता राहिलेला नाही तर खंडणीकर्ता झालेला आहे, अशी आजच्या राजकारणाची परिस्थिती आहे, यामुळे उद्योगधंदे उभारण्यास अडचणी येतात त्यामुळे निश्चितच पुन्हा रोजगार निर्मिती होत नाही अशावेळी तरुणांचे भविष्य धोक्यात आहे. त्यामुळे जात धर्माच्या पलीकडे जाऊन विकासाचे राजकारण होणे गरजेचे आहे.

प्रसन्न जोशी म्हणाले, राजकारणामध्ये प्रत्येकालाच निवडणूक लढवता येणार नाही, तसेच प्रत्येक जण आमदार खासदार होऊ शकत नाही, परंतु समाज माध्यमांचा उपयोग करून आपल्या व्यथा आणि तळमळ आपण मांडू शकतो समाजाचे प्रश्न समाज माध्यमांमध्ये मांडून त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करू शकतो. समाज माध्यमांचा उपयोग करून आपला ब्रँड बनवा आणि त्याचा उपयोग स्वतःसाठी आणि समाज उभारणीसाठी आपण करू शकतो.

# रत्नागिरी जिल्ह्यात लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांची पडताळणी सुरु

## प्रत्यक्ष भेट घेवून लाभार्थी महिलांची पडताळणी करणार; आरटीओ कार्यालयातून कळणार वाहन कोणत्या महिलेच्या नावावर

**अक्षराज : उमेश तबिब**

**दि.०८, दापोली (रत्नागिरी) :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसंदर्भात आता रत्नागिरी जिल्ह्यातील लाभार्थ्यांची पडताळणी सुरु झाली आहे. प्राप्त अर्जांसोबतच प्रत्यक्ष भेट घेवून लाभार्थी महिलांची पडताळणी करण्याचे महिला आणि बालविकास विभागाला सूचना देण्यात आल्या आहेत.




सोबतच रेशनकार्डनुसार कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीच्या नावे चारचाकी वाहन असल्यास अथवा कुटुंबातील व्यक्ती शासकीय कर्मचारी असल्यास लाभार्थी महिलेला या योजनेतून वगळण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी रत्नागिरी जिल्ह्यात ४ लाखाहून अधिक महिलांनी लाभ घेतला आहे.

या योजनेच्या निकषांनुसार अर्ज भरण्यात आले आहेत की नाही, याची पडताळणी करण्याचे काम आता राज्य शासनाने हाती घेतले आहे. लाभार्थी महिलेचा भरण्यात आलेला अर्ज, अर्जात भरलेली माहिती योग्य आहे की नाही, याची पडताळणी करण्याची जबाबदारी आता जिल्हा महिला बालविकास विभागावर सोपवण्यात आली आहे. त्यानुसार गेले काही दिवस प्रत्येक अर्जाची छाननी करण्यात येत आहे.

**अंगणवाडी सेविका घरोघरी जावून करणार पडताळणी -**

येत्या काही दिवसातच गावागावातील अंगणवाडी सेविका लाभार्थी महिलांची भेट घेवून माहिती गोळा करणार आहेत. तसेच लाभार्थी महिलांनी अर्जात भरलेली माहिती योग्य आहे की नाही, याची खात्री करणार आहेत.

**प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या महितीनुसार करणार पडताळणी -**

कोणत्या व्यक्तीच्या नावावर चारचाकी वाहन असल्याची माहिती प्रादेशिक परिवहन कार्यालयातून महिला बालविकास विभागाला देण्यात येणार आहे. या माहितीनुसार लाभार्थी महिलेच्या कुटुंबातील कुणाच्या ही नावावर चारचाकी वाहनाची नोंद असल्यास अशा महिलांना योजनेतून वगळण्यात येणार आहे.

**रेशनकार्डवर असलेल्या कुटुंबातील सदस्यांचा केला जाणार विचार -**

एक रेशनकार्ड, एक कुटुंब यानुसार विचार कला जाणार आहे. एका घरात एकापेक्षा जास्त रेशनकार्ड असल्यास संबंधित महिलेच्या स्वतंत्र रेशनकार्डनुसार विभागणी करण्यात येणार आहे.

महिलेचे नाव असलेल्या रेशनकार्डवरील सदस्यांपैकी कोणत्याही व्यक्तीच्या नावावर चारचाकी वाहन असल्यास तसेच कोणताही सदस्य शासकीय नोकरीत असल्यास तसेच महिलेने इतर कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ घेतला असल्यास अशा महिलेला या योजनेतून वगळण्यात येणार आहे.

# कल्याणच्या विजयनगर उतारावर अपघाताचे सत्र सुरूच

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०७, कल्याण (ठाणे) :** विजयनगर, कल्याण पूर्व येथील उतार अपघातप्रवण ठिकाण बनत चालला आहे. काल रात्री पुन्हा एक मोठा ट्रेलर दुभाजकावर आदळला. सुदैवाने जीवितहानी झाली नाही, मात्र या ठिकाणी वारंवार होणाऱ्या अशा अपघातांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विजयनगर हा फार गजबजलेला परिसर असून येथे शाळा, बँका, मंदिरे आणि दुकाने मोठ्या प्रमाणावर आहेत. त्यामुळे दिवसाच्या वेळेस येथे मोठी गर्दी असते. जर असे अपघात गर्दीच्या वेळी झाले, तर मोठी दुर्घटना घडू शकते आणि अनेक निष्पाप नागरिकांना आपले प्राण गमवावे लागू शकतात.

स्थानिक नागरिकांच्या मते, याच ठिकाणी याआधीही अनेक ट्रक आणि ट्रेलर अपघातग्रस्त झाले आहेत. मात्र, अद्याप प्रशासनाकडून ठोस उपाययोजना झालेली नाही. यामुळे हा उतार अपघाताचा अड्डा बनत चालला आहे.या धोकादायक परिस्थितीवर तोडगा म्हणून, स्थानिक नागरिकांनी प्रशासनाला दै. अक्षराजच्या वतीने मोठ्या ट्रक आणि ट्रेलरच्या वाहतुकीसाठी वेळेचे नियमन



करण्याची मागणी केली आहे. त्यांच्या मते, दिवसाच्या रहदारीच्या वेळी मोठी वाहने बंद करून, ती केवळ दुपारी किंवा रात्रीच्या वेळी सोडण्यात यावीत, जेणेकरून अपघातांची शक्यता कमी होईल. वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे वाहतूक विभाग आणि महापालिकेने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा भविष्यात येथे मोठी दुर्घटना घडल्यास प्रशासनाला जबाबदार धरले जाईल, असा इशारा ही स्थानिकांनी दिला आहे.

# महाराष्ट्राचा सुदेष्णा वेगवान धावपटू, संजीवनीला सुवर्ण

## १० हजार मीटर शर्यतीत संजीवनीला सुवर्ण तर किरणला रौप्य

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, उत्तराखंड :** नाशिकची खेळाडू संजीवनी जाधव हिने १० हजार मीटर्स धावण्याच्या शर्यतीत सुवर्णपदक जिंकून ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील पहिला दिवस गाजविला. सातारा येथील खेळाडू सुदेष्णा शिवणकर हिने वेगवान धावपटूचा मान मिळविला, तर पुरुषांच्या गटात पुण्याचा खेळाडू प्रणव गुरव याला १०० मीटर्स धावण्याच्या शर्यतीत रौप्यपदक मिळाले.

राजीव गांधी क्रीडा संकुलातील गंगा आंतरराष्ट्रीय ॲथलेटिक्स स्टेडियमवर आज या स्पर्धेचा पहिला दिवस महाराष्ट्राच्या दृष्टीने आनंददायी ठरला. सुदेष्णा शिवणकर हिने १०० मीटर धावण्याची शर्यत ११.७६ सेकंदात जिंकली. प्रणव गुरव याने १०० मीटर्स धावण्याची शर्यत १०.३२ सेकंदात पार केली. त्याला अगदी थोडक्यात सुवर्ण पदकाने हुलकावणी दिली.

महिलांच्या १० हजार मीटर शर्यत संजीवनी हिने ३३ मिनिटे ३३.४७ सेकंद या वेळेत पूर्ण केले. या शर्यतीमध्ये सुरुवातीपासूनच तिने आघाडी घेतली होती. आणि शेवटपर्यंत तिने ही आघाडी कायम ठेवली. किंबहुना शेवटच्या टप्प्यात तिने साडेतीनशे मीटर्सची आघाडी घेतली होती. तिचे या स्पर्धेतील हे दुसरे सुवर्ण पदक



आहे. यापूर्वी तिने याच क्रीडा प्रकारात एक रौप्य व एक सुवर्णपदक जिंकले होते.

**विजेतेपदाची खात्री होती - संजीवनी**

यंदा विजेतेपद राखायचे माझे ध्येय होते आणि त्या दृष्टीनेच मी या शर्यतीचे नियोजन केले होते. सुवर्णपदकासाठी चिवट लढत झाली असती, तर विक्रमी वेळ नोंदविली असती. मोठी आघाडी होती तरीही सातत्यपूर्ण वेग ठेवला होता, असे २८ वर्षीय खेळाडू संजीवनी हिने सांगितले. संजीवनी ही नाशिक येथे ज्येष्ठ आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक विजेंदर सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली दररोज ५ ते ६ तास सराव करीत आहे. ती येवला येथे तालुका क्रीडा अधिकारी म्हणून कार्यरत आहे.

**किरणचे पदार्पणातच पदक**

किरण याने १० हजार मीटर्सचे अंतर २९ मिनिटे ०४.७६ सेकंदात पार केले हिमाचल प्रदेशा सावंत बरवाल यांनी ही शर्यत २८ मिनिटे ४९.९३ सेकंदात पूर्ण करीत सुवर्णपदक जिंकले. या शर्यतीमध्ये सात किलोमीटर पर्यंत किरण हा सावन बरोबर धावत होता मात्र नंतर साबण याने जोरदार मुसंडी मारून आघाडी घेतली ती शेवटपर्यंत टिकविली. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील पहिलेच पदक आहे. २३ वर्षीय खेळाडू किरण हा मूळचा परभणी जिल्ह्यातील उसळदवाडी या खेडेगावातील खेळाडू आहे. लहानपणीच मातृ व पितृछत्र गमावलेल्या किरण याला त्याच्या आजीनेच वाढविले आहे. बारावी इयत्ता पूर्ण केल्यानंतर तो पुण्यातील आर्मी स्पोर्ट्स इन्स्टिट्यूट मध्ये हवालदार या पदावर काम करीत असून तेथे त्याला युनूस खान यांचे मार्गदर्शन मिळत आहे.

**मातीच्या मैदानावर सराव करीत सुदेष्णाची सोनेरी कामगिरी -**

सातारा येथे गेली आठ वर्षे मातीच्या मैदानावरच सराव करणाऱ्या सुदेष्णा हिने कृत्रिम ट्रॅक वर सराव करणाऱ्या खेळाडूंना मागे टाकत स्पृहणीय यश मिळवले. तिचे हे दुसरे सुवर्णपदक आहे २०२३ मध्ये झालेल्या स्पर्धेतही तिने सुवर्णपदक जिंकले होते. २१ वर्षीय सुदेष्णा ही सातारा येथेच ज्येष्ठ प्रशिक्षक बळवंत बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत आहे. खेलो इंडिया स्पर्धेतही खेलो इंडिया स्पर्धेतही तिने नेत्रदीपक यश मिळवले असून तिला इन्कम टॅक्स मध्ये नोकरी मिळाली आहे.

**कृत्रिम ट्रॅक लवकर व्हावा - सुदेष्णा**

आमच्या शहरात कृत्रिम ट्रॅक करिता शासकीय मान्यता मिळाली असून लवकरच हा ट्रॅक तयार करावा म्हणजे सातारा येथून आणखी आंतरराष्ट्रीय खेळाडू घडतील असेसुदेष्णने सांगितले.

**दुखापतीवर मात करीत प्रणवचे कौतुकास्पद यश**

जवळजवळ एक वर्ष पाठीच्या दुखण्यामुळे स्पर्धात्मक ॲथलेटिक्स पासून दूर असलेल्या प्रणव याने येथे रुपेरी कामगिरी करत शानदार पुनरागमन केले आहे. त्याचे हे दुसरे रौप्य पदक आहे तो मध्य रेल्वेमध्ये नोकरी करीत आहे. २३ वर्षीय खेळाडू प्रणव हा पुण्यातील सनस मैदानावर अरविंद चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत आहे. यापूर्वी त्याने राष्ट्रीय व राज्य स्तरावरील स्पर्धांमध्ये अनेक पदके जिंकली आहेत.

**प्रथमच रोबोचा उपयोग**

राष्ट्रीय स्पर्धेमध्ये प्रथमच रोबोचा उपयोग दिसून येत आहे. पदक वितरण प्रसंगी तसेच थाळी फेक स्पर्धेच्या वेळी रोबो चा उपयोग करण्यात आला.

# थोडक्यात

## महाश्वेता असोसिएशनच्या वतीने महाश्वेता जीवनगौरव पुरस्कार प्रदान

**अक्षराज : उमेश तबिब**

**दि.०८, दापोली (रत्नागिरी) :** आपत्तीच्या वेळी मदत करण्यास समाज नेहमीच अग्रेसर असतो. तसेच जैन समाज कोणताही क्षेत्रात पुढे आहे. मग ते वैद्य, पर्यटन, शिक्षण किंवा इतर कोणताही कार्यक्षेत्रात अजून प्रत्येकाच्या गरजा पूर्ण केल्यावर उरलेला पैसा त्यातील दोन टक्के निधी सामाजिक कार्यासाठी द्यावा. त्या मदतीनेच माणुसकी टिकते. असे मत विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केले आहे. नीलम गोऱ्हे यांनी उद्योगपती जवाहर मोतीलाल वीरचंद शहा (मालेगावकर) यांना सादर केले. यावेळी जैन विकास आर्थिक महामंडळ राज्यमंत्री स्तरीय चेअरमन ललित गांधी, महाश्वेता चेअरमन सुभाष शहा, सचिव प्रदीप पारिख, कोषाध्यक्ष चंद्रकांत शहा आणि इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी राकेश लालचंद शहा, डॉ.दीपक विनोद कुमार शहा, राजेश मोतीलाल शहा, डॉ.राजेश हिरालाल शहा, युवराज शहा, विलास जयंतलाल शहा, शर्मिला राजेंद्र सुराणा, अनिता रणजीत शहा यांना सामाजिक कार्यातील योगदानाबद्दल गौरविण्यात आले.



कार्यक्रम नियोजन आणि व्यवस्थापन शैलेश गुजर यांनी केले होते. ललित गांधी म्हणाले जैन समाज हा देशातील सर्वाधिक आयकर भरणारा आहे. मात्र त्याचवेळी दारिद्र्य रेषेखालील काही जणांचे चित्र हृदय द्रावक आहे. हे चित्र बदलण्यासाठी समाजातील व्यक्तींनी पुढे यायला हवे. आपल्या समाजाला अल्पसंख्यांक दर्जा आहे मात्र त्याचा लाभ घेण्यासाठी समाजातील नागरिकांनी पुढे यावे असे आव्हान गांधी यांनी केले. टाळांच्या कडकडात उत्तर देताना जवाहर शहा यांनी महाश्वेता यांना आणखी लोकांना सामावून घेण्यास सांगितले. संस्थेची व्याप्ती मोठी असून तिचा योग्य विस्तार करण्यासाठी मुंबई शहराचे केंद्रीकरण न करता पुणे आणि कोल्हापूरपर्यंत त्यांचे विकेंद्रीकरण करावे. अशी सूचना करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुभाष शहा यांनी केले.डॉ.दीपक विनोद कुमार शहा, युवराज शहा यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे व्यवस्थापन डॉ.द्वारे यांनी केले होते.

## माता रमाई आंबेडकर जयंती मोठ्या थाटामाटात साजरी



**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.०७, लोकमान्य नगर (ठाणे) :** चंद्रमणी बुद्धविहार समिती आयोजित त्यागमूर्ती माता रमाबाई भीमराव आंबेडकर यांची जयंती मागील ५ ते ६ वर्षांपासून खूप थाटामाटामध्ये साजरी केली जाते. त्याप्रमाणे यावर्षी पण जयंती साजरी केली गेली. प्रत्येक वर्षी वेगवेगळे कार्यक्रम केले जातात. यावेळी माता रमाबाई यांच्या जयंतीनिमित्त दिवे लावण्यात आले. स्त्रियांकरिता भाषणाचा व हळदी कुंकवाचा कार्यक्रम करण्यात आला. सदर कार्यक्रमास अध्यक्ष दिनेश खाडे, उपाध्यक्ष करण शिनगारे, सचिव सचिन त्रिभुवन, खजिनदार अमोल त्रिभुवन, सल्लागार उत्तम शिनगारे, सुरेंद्र जाधव, चद्रकांत बनसोडे, अनिता जाधव, मनीषा अहिरे, संगीता पवार, विद्या भोरे, आदी मान्यवर उपस्थित होते.

## टाकळीढोकेश्वर कावड यात्रेचे प्रस्थान

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळीढोकेश्वर येथिल बिरोबा कावड मित्र मंडळाच्या वतीने दरवर्षी कावड यात्रेचे आयोजन करण्यात येते. यावर्षी टाकळी ढोकेश्वर ते पुणतांबा कावड यात्रा टाकळी ढोकेश्वर येथे मोठ्या उत्साहात काढण्यात आली. यामध्ये बिरोबा कावड मित्रमंडळाच्या ३० सदस्यांनी सहभाग घेतला. डॉक्टर भाऊसाहेब खिलारी व उपसरपंच रामभाऊ तराळ यांनी कावड यात्रेचे नरळ वाढवून विधीवत पूजा केले. यावेळी संजय झावरे, संपत तराळ, बाबासाहेब खिलारी, बिरोबा कावड मंडळाचे अध्यक्ष अनिल माकरे, उपाध्यक्ष सागर नाईकवाडी, सल्लागार प्रसाद झावरे, दादा झावरे,संपत झावरे, जयसिंग जाधव, भाऊसाहेब रांधवण, बिरोबा भगत विष्णु धुमाळ,सोनू खिलारी, भगवान गायकवाड,गोटीराम आल्हाट, भाऊसाहेब झावरे, अनिल अंगारखे,भरत गायकवाड, बबन गोरडे, सुदाम झावरे, पाटील दाजी, कुशाभाऊ झावरे, संतोष तराळ, प्रविण झावरे उपस्थित होते.



फेब्रुवारी महिन्यातील माघ पौर्णिमेचे औचित्य साधून वाजत गाजत पायी कावड यात्रा काढण्यात आली. ही कावड यात्रा पुणतांबा येथिल चांगदेव महाराज समाधी स्थळाचे दर्शन घेऊन गोदावरी नदीच्या पाण्याचा अभिषेक पूर्वापार पद्धतीने केल्यानंतर कावड गोदावरी नदीच्या पाण्याने भरल्या जातात. गोदावरी नदीच्या पाण्याला गंगा नदी ईतकेच महत्त्व आहे. अभिषेक पुजा आरती झाल्यानंतर सायंकाळी कावड घेऊन भाविक रवाना झाले. पुणतांबा, राहाता, निर्मळ पिंपरी, शिबलापूर, साकुर, खडकवाडी याठिकाणी मुक्काम करून तर ठिक ठिकाणी विसावा घेऊन ते पुढील यात्रेसाठी रवाना झाले.

# कृषी तंत्र निकेतन खंडाळाचे स्नेहसंमेलन उत्सहात संप्पन्न

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०८, खंडाळा (सातारा) :** खंडाळा विभाग शिक्षण समिती संचालित रामचंद्र धोंडिबा खंडागळे कृषी तंत्र निकेतन खंडाळा जि.सातारा महाविद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ २०२५ शुक्रवार दि. ७ फेब्रुवारी रोजी अत्यंत उत्साहात पार पडला. या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. तानाजी नरुटे मा.संचालक विस्तार शिक्षण,महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी,कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव अनिरुद्धदादा गाढवे, राजेंद्र विद्यालय खंडाळा प्राचार्य शब्बीर नालबंद, माजी प्राचार्य सावंत सर,जितेंद्र गाढवे सर,खंडाळा नगरपंचायतचे आजी माजी नगरसेवक आदी उपस्थित होते.

यावेळी प्रथम मान्यवरांचे हस्ते सरस्वती पूजन आणि दिपप्रज्वलन करण्यात आले.यानंतर कृषी तंत्र निकेतनचे प्राचार्य माने सर यांनी उपस्थित मान्यवर आणि विद्यार्थी पालक यांचे स्वागत करून या कृषी तंत्र निकेतनच्या स्थापना आणि



आजपर्यंतचा इतिहास याबाबत माहिती दिली. या कृषी तंत्र निकेतन मधून शिक्षण घेऊन आजवर अनेक यशस्वी विद्यार्थ्यांनी विविध शासकीय तसेच खासगी क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवीत महाविद्यालयाचा लौकिक वाढवला असून अनेक विध्यार्थी स्वतःचा व्यवसायात यशस्वी ठरले असल्याचे सांगितले.

प्रमुख पाहुणे डॉ. तानाजी नरुटे आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना आपली संगत जर चांगली असेल तर एखादा सर्वसामान्य विद्यार्थी देखील अभ्यासात सातत्य राखत यशस्वी भविष्य घडवू शकतो. तर संस्थेचे सचिव अनिरुद्ध गाढवे यांनी रामचंद्र धोंडिबा खंडागळे बापू यांनी या कृषी तंत्र निकेतन साठी आपल्या संस्थेस जमीन दिल्यामुळेच आजची ही महाविद्यालयाची वास्तू उभी राहिली असून गेल्या काही वर्षात शेकडो विद्यार्थी या कृषी तंत्र निकेतन मध्ये शिकून यशस्वी जीवन जगत आहेत. आगामी काळात कृषी क्षेत्रात अनेक संधी आपल्या या महाविद्यालयातील विदयार्थ्यांना उपलब्ध होणार आहेत.सर्व विध्यार्थ्यांना भावी वाटचालीस त्यांनी यावेळी शुभेच्छा दिल्या.